T.y.B.A Marathi - Pape[...] APRil 2013

AGJ 1st half (a) 33

**Con. 344-13.** [...]78

(3 Hours) **[ Total Ma[...]**

StudentBounty.com

**सूचना :** (१) प्रश्न क्रमांक **१** ते **८** पैकी कोणतेही **चार** प्रश्न सोडवा.
(२) प्रश्न क्रमांक **९** सोडविणे **आवश्यक** आहे.
(३) एकूण **पाच** प्रश्न सोडवा.
(४) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत.

१. महानुभावीय गद्य साहित्यातील विविधता स्पष्ट करा.

२. परमेश्वरभक्ती, आत्माविष्कार आणि समाजप्रबोधन या प्रेरणांचा वारकरी संत साहित्यावर झालेला परिणाम विशद करा.

३. आशय व अभिव्यक्तीच्या दृष्टीने संत साहित्यापेक्षा पंडिती साहित्य कसे वेगळे आहे ते विशद करा.

४. "'शृंगार' आणि 'वीररस' ही शाहिरी कवितेची प्रमुख वैशिष्ट्ये आहेत," हे सोदाहरण स्पष्ट करा.

५. नाथ, दत्त, समर्थ, लिंगायत या पंथियांच्या साहित्याच्या प्रेरणा व स्वरूप स्पष्ट करा.

६. "'धर्मप्रसार' ही अन्य धर्मियांच्या वाङ्मयनिर्मितीमागील एक प्रमुख प्रेरणा होती," हे विधान स्पष्ट करा.

७. मध्ययुगीन मराठी वाङ्मय विविध प्रकारांनी नटलेले आहे, कसे ते स्पष्ट करा.

८. प्राचीन मराठी बखर साहित्याच्या प्रेरणा व स्वरूप स्पष्ट करा.

९. प्रत्येक गटातील **दोन** टिपा लिहा :- (एकूण **चार** टिपा लिहा)

| **'अ'** गट | **'ब'** गट |
| --- | --- |
| (१) लीळाचरित्र | (१) मुकुंदराज |
| (२) एकनाथकृत भावार्थ रामायण | (२) चोखामेळा |
| (३) श्लोक केकावली | (३) फादर स्टिफन्स |
| (४) आज्ञापत्र | (४) प्रभाकर |

---

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

StudentBounty.com

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

T.Y.B.A
Marathi - Paper - V

P4-RT-Exam.-Feb.-13-52

**Con. 332-13.**

P

(3 Hours) [Total Marks :

4 | May | 13

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्न सोडविणे **आवश्यक** आहे.
(२) **उजवी**कडील अंक **पूर्ण** गुण दर्शवितात.

१. भरतमुनींचे रसविषयक सूत्र सविस्तर स्पष्ट करा. १२

**किंवा**

टिपा लिहा :-
(अ) वामनाचा रीतिविचार
(ब) अलौकिक ध्वनी.

२. ॲरिस्टॉटलच्या अनुकृती सिद्धांताचे सविस्तर विवेचन करा. १२

**किंवा**

टिपा लिहा :-
(अ) क्षेमेंद्राचा औचित्यविचार
(ब) रसविघ्ने.

३. साहित्याची भाषा म्हणून 'लक्षणा' या शब्दशक्तीचे स्वरूप व प्रकार स्पष्ट करा. १२

**किंवा**

टिपा लिहा :-
(अ) साहित्याच्या भाषेतील प्रतिमेचे स्वरूप
(ब) मुक्तछंद.

४. साहित्यनिर्मितीचे कारण म्हणून प्रतिभेचे स्वरूप विशद करा. १२

**किंवा**

टिपा लिहा :-
(अ) कोलरिजप्रणित कल्पनाशक्ती
(ब) व्युत्पत्ती एक काव्यकारण.

५. काव्यप्रयोजन म्हणजे काय ? मम्मटाच्या काव्यप्रयोजनांचा परामर्श घ्या. १२

**किंवा**

टिपा लिहा :-
(अ) भामहाने दिलेली काव्यप्रयोजनकारिका
(ब) जीवनभाष्य एक काव्यप्रयोजन.

[TURN OVER

StudentBounty.com
www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

StudentBounty.com

६. अभिनवगुप्ताची रस प्रक्रियेसंबंधीची मीमांसा स्पष्ट करा.

**किंवा**

टिपा लिहा :-

(अ) कॅथार्सिस एक विरेचनवादी भूमिका

(ब) रिचर्डसचा प्रेरणा संतुलन सिद्धांत.

७. साहित्य समीक्षा प्रक्रियेतील घटक अंगाचा परिचय करून द्या. १२

**किंवा**

टिपा लिहा :-

(अ) समीक्षेची कार्ये

(ब) कलाकृतीचे विश्लेषण.

८. पुढील प्रश्नांची **उत्तरे** पूर्ण वाक्यात लिहा (कोणतेही १६) :- १६

(अ) काव्यालंकार ग्रंथाचा कर्ता कोण ?

(ब) वक्रोक्तीचे कोणतेही दोन प्रकार लिहा.

(क) नाट्यदर्पणकाराचे नाव सांगा.

(ड) कोणतीही दोन रसविघ्ने लिहा.

(इ) भरतानी किती सात्विक भाव मानले ?

(प) शिवेतरक्षतये म्हणजे काय ?

(फ) जगन्नाथकृत काव्याची व्याख्या सांगा.

(भ) ध्वनि हाच काव्याचा आत्मा असे कोणी म्हटले आहे ?

(च) व्यंजनेचे प्रकार कोणते ?

(छ) रससुद्धा ध्वनित होतो असे कोणी म्हटले ?

(ज) शब्दाच्या तीन शक्ती कोणत्या ?

(झ) विभावाचे प्रकार लिहा.

(ग) भारतीय साहित्यशास्त्रातील पहिला ग्रंथ कोणता ?

(न) 'अपूर्ववस्तूनिर्माणक्षमा प्रज्ञा' ही व्याख्या कोणाची ?

(र) अजहल् लक्षणा कोणत्या लक्षणेला संबोधले जाते ?

(स) आनंदवर्धनाने रसभंगाचे कारण कोणते मानले ?

(य) समीक्षेच्या कोणत्याही दोन घटकांची नावे लिहा.

(त) कोलरिजने प्रतिभेचे कोणते दोन भाग मानले ?

(ल) प्रतिमेचे प्रकार कोणते ?

(व) क्षेमेंद्राने कोणता ग्रंथ लिहिला.

-----------------

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

T.Y.B.A
Marathi - Paper VI

3

50 : 1st half.13-shilpa(a)

**Con. 341-13.** **(REVISED COURSE)** **P**

(2½ Hours) **[Total Marks : 80**

17/May/13

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्नांना **समान गुण** आहेत (प्रत्येकी **२०**).
(२) दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या **(IDOL)** विद्यार्थ्यांसाठी वेळ **३** तास व **एकूण गुण १००** आहेत, (प्रत्येक प्रश्नास **२५** गुण).

१. (अ) साहित्य आणि समाज यांचा संबंध सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'समाज बदलाबरोबर साहित्यही बदलत असते म्हणून सामाजिक मूल्यांचे जतन, संवर्धन आणि संक्रमण करण्याचे काम साहित्य करत असते.' या विधानाचा सोदाहरण परामर्श घ्या.

२. (अ) बाबूराव बागूल यांच्या 'सूड' या कादंबरीच्या आधारे दलित स्त्रीच्या जीवनसंघर्षाचे स्वरुप स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) 'सूड' या कादंबरीतील जानकी स्वतःवर व इतरांवर कशा प्रकारे सूड घेते ते सोदाहरण स्पष्ट करा.

३. (अ) जान्हवीच्या जीवनप्रवासाच्या आधारे पुरुषप्रधान संस्कृतीत स्त्रीची होणारी घुसमट 'अवकाश' या कादंबरीत सानियाने कशी मांडली आहे ते सांगा.

**किंवा**

(ब) स्त्रीवादी समीक्षेच्या अंगाने 'अवकाश' या कादंबरीचे परीक्षण करा.

४. (अ) 'गावठाण' या कादंबरीतून पश्चिम महाराष्ट्रातील आजचे ग्रामीण व प्रादेशिक जीवन कशा प्रकारे प्रतिबिंबित झाले आहे ते सविस्तर सांगा.

**किंवा**

(ब) आनंदीच्या कुटुंबकथेच्या आधारे कृष्णात खोत यांनी 'गावठाण' या कादंबरीत ग्रामीण जीवनातील वास्तव कशा प्रकारे मांडले आहे ते सांगा.

************************

StudentBounty.com
www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

StudentBounty.com
www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

T.Y.B.A
Marathi - Paper VII

4

AGJ 1st half (a) 28

**Con. 301-13.**

57

(3 Hours) [ Total Ma...

13 | Ap...

**सूचना : सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत (प्रत्येकी **२०** गुण).

१. भाषिक संदेशन व भाषेतर संदेशन यांच्यातील फरक स्पष्ट करून भाषेची लक्षणे सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

भाषाभ्यासाच्या पध्दती सांगून वर्णनात्मक भाषाभ्यास पध्दतीचे स्वरूप स्पष्ट करा.

२. स्वनपरिवर्तनाचे स्वरूप सांगून स्वनपरिवर्तनाचे विविध प्रकार सोदाहरण विशद करा.

**किंवा**

भाषिक परिवर्तन ही संकल्पना स्पष्ट करून अर्थपरिवर्तनाच्या कारणांचा सोदाहरण परामर्श घ्या.

३. मराठीतील शब्दजातींची पारंपरिक व्यवस्था स्पष्ट करून 'सर्वनाम' या शब्दजातीची सविस्तर मांडणी करा.

**किंवा**

भाषेतील 'प्रयोग' म्हणजे काय ते सांगून कर्तरी व कर्मणी प्रयोग सोदाहरण स्पष्ट करा.

४. मराठीतील विभक्ती व्यवस्था थोडक्यात सांगून ती प्रत्ययावरून मानावी की अर्थावरून, या संदर्भातील मतमतांतरांचा परामर्श घ्या.

**किंवा**

शब्दसिध्दीचे स्वरूप स्पष्ट करून 'समास' या प्रकाराची सविस्तर चर्चा करा.

५. (अ) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :-

(१) भाषा : एक संकेतप्रणाली

(२) तौलनिक भाषाभ्यास पध्दती

(३) अर्थविस्तार

(४) पद, पदिम व पदांतरे

(ब) खालीलपैकी कोणत्याही **दोहों**वर टिपा लिहा :-

(१) नाम

(२) भावे प्रयोग

(३) सामान्यरुप

(४) अभ्यस्त शब्द

---

StudentBounty.com

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

StudentBounty.com

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

T.Y.B.A
Marathi - VIII

AGJ 1st half (a) 26

**Con. 305-13.** **(OLD COURSE)** 5 ...85

(3 Hours) [ Total Ma...
22 Apr...

StudentBounty.com

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत (प्रत्येकी **२०** गुण).
(२) **विवक्षित** पुस्तकांच्या संदर्भातील प्रश्नांची उत्तरे लिहिताना **लेखकाच्या** इतर **पुस्तकांची** योग्य ती **उदाहरणे** देणे **आवश्यक** आहे.

१. (अ) विशिष्ट लेखकाभ्यासाच्या विविध पध्दती सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) चिं.त्र्यं. खानोलकरांच्या समग्र साहित्यातून प्रत्ययास येणारी त्यांच्या लेखनाची गुणवैशिष्ट्ये साधार स्पष्ट करा.

२. (अ) मानवी मनात चाललेल्या 'द्वंद्वात्मकतेचा शोध' अवध्य मध्ये चिं.त्र्यं. खानोलकरांनी कसा घेतला आहे ते सोदाहरण सांगा.

**किंवा**

(ब) नाटककार चिं.त्र्यं. खानोलकरांच्या नाट्यप्रतिभेचे वेगळेपण 'अवध्य' च्या आधारे सोदाहरण स्पष्ट करा.

३. (अ) ''कोंडुरा' या कादंबरीमध्ये चिं.त्र्यं. खानोलकरांनी स्त्री दुःखाला वाचा फोडली आहे'. सविस्तर परामर्श घ्या.

**किंवा**

(ब) चिं.त्र्यं. खानोलकरांच्या कांदबरी लेखनाची ठळक वैशिष्ट्ये 'कोंडुराच्या' आधारे विशद करा.

४. (अ) 'आरती प्रभू यांच्या कवितेत प्रेयसीची विविध रुपे दिसतात.' 'नक्षत्रांचे देणे' च्या आधारे वरील विधानाचा परामर्श घ्या.

**किंवा**

(ब) मानवी मनातील प्रेमभावनेची विविध रुपे, विविध तऱ्हा आरती प्रभूंच्या कवितेत कशा प्रत्ययास येतात ते 'नक्षत्रांचे देणे' च्या आधारे स्पष्ट करा.

५. (अ) 'वारा वाजे रुणझुणा' या ललित लेखसंग्रहाची गुणवैशिष्ट्ये सोदाहरण सांगा.

**किंवा**

(ब) 'वारा वाजे रुणझुणा' या ललित लेखसंग्रहाचा अभ्यास केल्यानंतर त्यातील विषयाची विविधता कशी दिसते, ते सोदाहरण स्पष्ट करा.

---

[TURN OVER

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

Con. 308-13. (REVISED COURSE) PL

(3 Hours) [ Total Marks : 10

StudentBounty.com

**सूचना** : (१) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत. (प्रत्येकी **२०** गुण)
(२) विवक्षित पुस्तकांच्या सदर्भातील प्रश्नांची उत्तरे लिहिताना **लेखकाच्या** इतर **पुस्तकांची योग्य** ती **उदाहरणे** देणे **आवश्यक** आहे.

१. (अ) विशिष्ट लेखकाभ्यास म्हणजे काय ते सांगून या अभ्यासपध्दतीबाबत अभ्यासकाला कशाकशा संदर्भात सजगता बाळगावी लागते, याचा परामर्श घ्या.

**किंवा**

(ब) जयवंत दळवी यांच्या साहित्याच्या अभ्यासातून त्यांची जीवनदृष्टी कशी प्रत्ययास येते, त्याची उदाहरणांद्वारे चर्चा करा.

२. (अ) " 'अंधाराच्या पारंब्या' या जयवंत दळवी लिखित कादंबरीतून मानवी मनाच्या विविध कंगोऱ्यांवर प्रकाश पडतो." चर्चा करा.

**किंवा**

(ब) " 'अंधाराच्या पारंब्या' या जयवंत दळवी यांच्या कादंबरीतून तत्कालीन स्त्री-दुःख अत्यंत प्रभावीपणे व्यक्त झाले आहे." या विधानाची चिकित्सा करा.

३. (अ) 'वेचक जयवंत दळवी' या कथासंग्रहातील आशयाची विविध रुपे उदाहरणांसह मांडा.

**किंवा**

(ब) 'वेचक जयवंत दळवी' या कथासंग्रहाच्या आधारे कथालेखक म्हणून जयवंत दळवी यांचे कोणकोणते विशेष प्रत्ययास येतात, त्यांचा आढावा घ्या.

४. (अ) " 'अपत्य वियोग आणि उतारवयातील एकाकीपण यामुळे सोसावे लागणारे दुःख 'संध्याछाया' या नाटकात प्रभावीपणे चितारलेले दिसते." या विधानाची चर्चा करा.

**किंवा**

(ब) 'संध्याछाया' या जयवंत दळवी यांच्या नाटकाच्या आधारे नाटककार जयवंत दळवी यांच्या नाट्यलेखन शैलीचे विशेष सोदाहरण उलगडून दाखवा.

५. (अ) 'सारे प्रवासी घडीचे' या जयवंत दळवी यांच्या कलाकृतींतील ठळक व्यक्तिरेखांचा परिचय करुन द्या.

**किंवा**

(ब) " 'सारे प्रवासी घडीचे' या कलाकृतींमधून जयवंत दळवी यांनी विस्मरणात गेलेल्या कोकण प्रांताला जिवंत केले आहे." या विधानाची साधक-बाधक चिकित्सा करा.

************************

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

T.Y.B.A
Marathi - IX

30 : 1st half.13-AM(b)

**Con. 317-13.** P...

26 | Apr...

(2½ / 3 Hours) [Total Marks : 80 / 1...

**(सूचना : दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL)** विद्यार्थ्यांसाठी वेळ **तीन** तास व **एकूण** गुण **१००** आहेत.)

१. (अ) भाषांतर, अनुवाद, रूपांतर व अर्वाचिनीकरण या संकल्पनांच्या आधारे भाषांतराची व्यापकता उलगडून दाखवा. १५

**किंवा**

(ब) जागतिकीकरणामुळे भाषांतराच्या क्षेत्रात कोणकोणत्या विविध संधी निर्माण झाल्या आहेत, सविस्तर ऊहापोह करा.

२. (अ) ललित वाङ्मयाच्या भाषांतरात 'शैली' हा घटक कसा महत्त्वाचा आहे, साधार विशद करा. १५

**किंवा**

(ब) दोन भाषांतील सांस्कृतिक अंतरामुळे वाङ्मयीन भाषांतरात कोणकोणत्या अडचणी उद्‌भवतात, उदाहरणांसह चर्चा करा.

३. पुढीलपैकी **इंग्रजीतील एक, हिंदीतील एक** आणि **मध्ययुगीन मराठी** गद्यापैकी एक अशा **एकूण तीन** उताऱ्यांचे मराठीत भाषांतर करा. ३०

(अ) In appearances, beliefs and opinions, human beings are different from one another. Diversity adds beauty to life. But when we introduce differences where Nature never planned any, we are dividing society along artificial lines. These unnatural divisions are not healthy for the nation and its people. No one can benefit from them. These are man-made differences that we must **not** accept.

(ब) There are about 200 tribal communities scattered all over the Indian subcontinent. In spite of wide differences in physical features, languages, religious and cultural practices, the common factor that binds them together is that all these communities are underprivileged and backward.

(क) वर्तमान में जनसंख्या-विस्फोट भारत के लिए एक समस्या बनी हुई है। जनसंख्या की दृष्टि से भारत का स्थान विश्व में दूसरा है, जबकि क्षेत्रफल में यह विश्व मे सातवें स्थान पर है। बढ़ती हुई जनसंख्या का अंदाजा इसी से लगाया जा सकता है कि स्वतंत्रता प्राप्ति के समय भारत की आबादी मात्र ३६ करोड़ थी, जो आज एक अरब १५ करोड़ से अधिक हो चुकी है। भारत का क्षेत्रफल दुनिया के क्षेत्रफल का २.५ प्रतिशत है, जबकि विश्व की १५ प्रतिशत आबादी भारत में ही बसती है। अगर भारत में जनसंख्या इसी तरह बढ़ती रही, तो वह समय दूर नहीं, जब यहां के निवासियों को रहने तक की जगह नहीं मिलेगी।

[ TURN OVER

StudentBounty.com
www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

StudentBounty.com

(ड) पुस्तकालय का सबसे बड़ा लाभ यह है कि यहां मनुष्य को थोड़े से शुल्क से अधिक पुस्तकें पढ़ने को मिल जाती हैं। यदि वह चाहे तो एक ही विषय से संबंधित अनेक पुस्तकें पढ़ सकता है। दूसरे उसे वहां से प्रत्येक विषय की नवीनतम पुस्तकें मिल सकती हैं। तीसरे उसे किसी भी विषय पर तुलनात्मक अध्ययन करने का अवसर मिल जाता है। इसी कारणवश उच्च कक्षा तथा किसी भी विषय में विशेष योग्यता प्राप्त करने के इच्छुक विद्यार्थी अपना अधिकांश समय ऐसे ही पुस्तकालय में व्यतीत करते हैं।

(इ) **फलेठाणीं** कऱ्हाडेया ब्राह्मणाचां घरीं अवतारू स्वीकरीला : मग **केतुले** एक दीस राज्य केलें : एकदिनीं **श्राध** जालें : तैं **गोसावीयां** भार्या **रतीचीया चाडा** विनविलें : आणि गोसावियासि तेव्हळिं **ब्रह्मचर्याची प्रवृत्ती** : मग तें निमीत्य करूनि **मातापुरा बीजें केलें** : तेथ देवगीरीवरी बीजें करीतां : श्रीदत्तात्रएप्रभु व्याघ्राचा **वेखु** धरूनि जाळि तळुनि बीजें केलें : **हाक दीधली** : **श्रीमुगुटीं** चवडा ठेविला : लोकू भीयाला : तो **पर्ता केला** : तेथ **शक्ति स्वीकरिली'**।। जवं लोकू **द्वारावतीए** जाए तवं गोसावी तेथ होते : मग बीजें केलें : द्वारावतीए।।

(फ) एकू वेळ रानीं **जाळी** एकी **बीजें** केलें होतें : तेथ **लाहासिर्चीं** पीलीं होतीं : ते **पारधी गेली होती** : तीयें पीलीं गोसावी खेळवीलीं : तवं ते आली : गोसावी अवलोकीली : **रोखू** नीवर्तला : मग ते **मोळी** टेकौनि बैसली : सूनेयाचिया परी : मग **नावेक** गोसावी पीलीं खेळविलीं : वडुवें धरूनि एरी कडीचां ऐरी कडी घातलीं : मग तीएची तीएकडे घालुनि गोसावी बीजें केलें :।।

**सूचना :** (१) **नियमित विद्यार्थ्यांनी** पुढीलपैकी **एका** विषयावर निबंध लिहावा.
(२) **दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या विद्यार्थ्यांनी** पुढीलपैकी कोणतेही **दोन** निबंध लिहावेत.

४. पुढीलपैकी कोणत्याही **एका** विषयावर निबंध लिहा :- २०/४०

(अ) संगणकयुगातील वाचनसंस्कृती
(ब) जागतिकीकरण आणि मराठी भाषा
(क) साहित्यसंमेलने अर्थात साहित्यसंस्कृतीचा उत्सव
(ड) मराठी बालसाहित्य
(इ) माझे वाचन - माझा विकास

---

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

VT-F.H.Exam. Feb.-13- 45

TYBA Marathi - VI

**Con. 338–13.**

**(OLD COURSE)**

| | | |
|---|---|---|
| **For Regular Students ]** | ( 2½ Hours ) | **[ Total Marks :** |
| **For IDOL Students ]** | ( 3 Hours ) | **[ Total Marks : 100** |

17/May/13

**सूचना :** (१) **सर्व** प्रश्नांना **समान** गुण आहेत. (**प्रत्येकी २०** गुण)

(२) **दूर व मुक्त अध्ययन संस्थेच्या (IDOL)** विद्यार्थ्यांसाठी वेळ **३** तास व **एकूण गुण १००** (**प्रत्येक** प्रश्नास **२५** गुण) आहेत.

१. (अ) साहित्य आणि समाज यांच्यातील परस्पर संबंधाविषयी विचारवंतांनी मांडलेले विचार स्पष्ट करा व साहित्य आणि समाज यांच्या संबंधांची विविध वाङ्मयांच्या आधारे चर्चा करा.

**किंवा**

(ब) समाजात होत असलेल्या मूल्यबदलांचे प्रतिबिंब साहित्यात कसे उमटत असते ते सोदाहरण स्पष्ट करा.

२. (अ) महानगरीय मनोवृत्तीचे चित्रण 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत कसे आले आहे ते सांगा.

**किंवा**

(ब) 'एका संसारिक सुशिक्षित बेरोजगाराची व्यथा 'निष्पर्ण वृक्षावर भर दुपारी' या कादंबरीत समर्थपणे रेखाटली आहे'. या विधानाची योग्यायोग्यता स्पष्ट करा.

३. (अ) समाजाच्या जवळजवळ सर्व स्तरातल्या स्त्रियांच्या समस्या 'तिची कथा' या संग्रहात कशाप्रकारे अंतर्भूत झाल्या आहेत ते सोदाहरण स्पष्ट करा.

**किंवा**

(ब) पुरूष प्रधान समाजव्यवस्थेत दडलेल्या स्त्री शोषणाच्या कंगोऱ्यांचा उलगडा 'तिची कथा' या कथासंग्रहातून कशा प्रकारे झाला आहे ते सांगा.

४. (अ) 'एसईझेड' मुळे उध्वस्त होत चाललेल्या ग्रामीण जीवनाचे प्रातिनिधिक चित्रण 'सेझ' या कांदबरीत कसे आले आहे ते सांगा.

**किंवा**

(ब) ग्रामीण समाजव्यवस्थेतील समाजकारण, राजकारण, त्यावर होत असलेले शहरीकरणाचे आक्रमण यामुळे भांबावलेल्या ग्रामीण तरूणांचे संघर्षमय जीवन 'एसईझेड' मध्ये कसे चित्रित झाले आहे ते सांगा.

*********

StudentBounty.com
www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers

StudentBounty.com

www.StudentBounty.com
Homework Help & Pastpapers